## शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

प्रति,
मा.प्राचार्य,
सर्व संलग्न विधी महाविद्यालये,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

**महोदय/महोदया,**

सन २०१७-१८ मध्ये विधी अभ्यासक्रमासाठी प्रवेशित असलेल्या विद्यार्थ्यांच्या प्रवेशित याद्यामधील त्रुटी पडताळणीसाठी सर्व विधी महाविद्यालयांना डेक्कन कॉलेज, पुणे येथे दि.१६/०४/२०१८ ते दि.२०/०४/२०१८ या कालावधीमध्ये बोलविण्यात आले असल्याबाबतचे शिक्षण संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे क्र.-उशिसं/विधी/विशिसस/बैठक/ प्र.क्र.४०-१८/सीईटीसेल/४३५०, दि.०६ एप्रिल,२०१८ चे पत्र आपल्या माहितीसाठी व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी पाठविले आहे. त्यानुसार तात्काळ कार्यवाही करण्यात यावी.

कळावे,

आदेशान्वये,
उपकुलसचिव

सोबत - वरीलप्रमाणे.

संदर्भ क्र. संलग्नता/टी-२/ 83
दि. 12 APR 2018

महाराष्ट्र शासन
शिक्षण संचालनालय, (उच्च शिक्षण)
महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे ४११००१.
Web:www.dhepune.gov.in E-mail : law.dhepune@nic.in
फोन नं. ०२०/२६०५१७२९,२६१२२११९,२६०५१५१२, फॅक्स नं.०२०/२६१११९५३

क्र.-उशिसं/विधी/विशिसस/बैठक/प्र.क्र.४०-१८/सीईटीसेल/ ४३५० दिनांक - 6 APR 2018

प्रति,

प्राचार्य,
केंद्रीय प्रवेश प्रक्रियेमध्ये सहभागी सर्व विधी महाविद्यालये

**विषय : विधी अभ्यासक्रमास दिलेले प्रवेश रद्द केल्यासंबंधी . . .**

संदर्भ : १. विधी शिक्षण सल्लागार समितीची बैठक दिनांक २६.०३.२०१८
२. शासनपत्र क्र. विधी-२०१८/प्र.क्र.११७/मशि-२, दिनांक ०६.०४.२०१८

उपरोक्त विषयी, विधी केंद्रीभूत प्रवेश प्रक्रिया सन २०१७-१८ द्वारे राज्यातील विधी महाविद्यालयामध्ये ३ व ५ वर्षीय विधी अभ्यासक्रमासाठी प्रवेशित विद्यार्थ्यांची शैक्षणिक कागदपत्रांची संचालनालय स्तरावर गठीत समितीद्वारे तपासणी करतेवेळी काही विद्यार्थी आवश्यक शैक्षणिक अर्हता धारण करीत नसल्याचे निदर्शनास आले होते. त्यानुषंगाने सदरहू विद्यार्थी विधी अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी पात्र नसल्याचा शेरा त्यांचे नावासमोर दर्शविण्यात आला होता.

यापैकी काही विद्यार्थ्यांनी मा. उच्च न्यायालयात रिट याचिका दाखल केली आहेत. यापैकी काही याचिकांचा तपशिल खालीलप्रमाणे -

| अ.क्र. | मा. उच्च न्यायालय | याचिका क्रमांक | याचिकाकर्ते | प्रवेश रद्द तपशिल |
|---|---|---|---|---|
| १ | मा. उच्च न्यायालय, मुंबई | या. क्र. २४२००/२०१७ ( विधी ५ वर्षीय अभ्यासक्रमास प्रवेश मिळणेबाबत ) | सुशांत जावीर | ११ वी अनुत्तीर्ण. |
| २ | मा. उच्च न्यायालय, मुंबई | या. क्र. २१०३/२०१८ ( विधी ३ वर्षीय अभ्यासक्रमास प्रवेश मिळणेबाबत ) | आरती वटवे | ११ वी अनुत्तीर्ण. व १२ वी १७ नं. चा अर्ज भरुन दुरस्थ पध्दतीने उत्तीर्ण |
| ३ | मा. उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद | या. क्र. २३०३/२०१७ ( विधी ३ वर्षीय अभ्यासक्रमास प्रवेश मिळणेबाबत ) | मंदा खरात | १२ वी १७ नं. चा अर्ज भरुन दुरस्थ पध्दतीने उत्तीर्ण. |



Shivaji University, Kolhapur
Affiliation T-2
Inward No. 5078
Date 11/04/2018

२. उपरोक्त याचिकांपैकी काही याचिकांमध्ये मा. उच्च न्यायालयाने याचिकाकर्त्या विद्यार्थ्यांचे प्रवेश सुरु ठेवण्याबाबत अंतरिम आदेश दिलेले आहेत. त्यानुषंगाने १० वी बहिस्थ / दुरस्थ पध्दतीने उत्तीर्ण, ११ वी अनुत्तीर्ण, १२ वी बहिस्थ / दुरस्थ पध्दतीने उत्तीर्ण असलेल्या विद्यार्थ्यांच्या प्रवेशाबाबत पुढील कार्यवाहीची रुपरेषा टरविणेसाठी विधी शिक्षण सल्लागार समितीची बैठक दिनांक २६.०३.२०१८ रोजी आयोजित करण्यात आली होती. त्यामध्ये पुढीलप्रमाणे निर्णय घेण्यात आलेला आहे.

३. (अ) उपरोक्त प्रकरणे ही मा. उच्च न्यायालयामध्ये न्यायप्रविष्ट आहेत, त्यामुळे ११ वी अनुत्तीर्ण, १२ वी बहिस्थ / दुरस्थ पध्दतीने उत्तीर्ण असलेल्या विद्यार्थ्यांचे प्रवेश हे सद्यस्थितीत रद्द न करता सुरु टेवण्यात यावेत, तसेच संबंधित विद्यार्थ्यांना त्यांचे प्रवेश याप्रकरणी मा. उच्च न्यायालयामध्ये दाखल असलेल्या याचिकांमधील अंतिम आदेशाच्या अधिन राहून सुरु टेवण्यात येत असल्याचे कळवून, त्यांचेकडून असे प्रतिज्ञापत्र घेण्यात यावे.

(ब) उर्वरित प्रकरणांमध्ये म्हणजेच १० वी बहिस्थ / दुरस्थ पध्दतीने उत्तीर्ण असलेल्या विद्यार्थ्यांच्या बाबतीत भारतीय विधिज्ञ परिषद, नवी दिल्ली यांचेकडून अभिप्राय मागविण्यात आले आहेत. सदरहू अभिप्राय प्राप्त होईपर्यंत या विद्यार्थ्यांचे प्रवेश हे भारतीय विधिज्ञ परिषद, नवी दिल्ली यांचेकडून विषयांकित प्रकरणामध्ये प्राप्त होणाऱ्या अभिप्रायाच्या अधिन राहून सुरु ठेवण्यात येत असल्याचे कळवून, त्यांचेकडून असे प्रतिज्ञापत्र घेण्यात यावे.

४. राज्यातील सर्व विधी महाविद्यालयांनी सदरहू पत्र सर्व संबंधितांच्या निदर्शनास आणून उक्त "अ" व "ब" मध्ये नमूद केल्याप्रमाणे कार्यवाही करावी. तसेच, संचालनालयामार्फत सन २०१७-१८ मध्ये विधी अभ्यासक्रमासाठी प्रवेशित असलेल्या विद्यार्थ्यांच्या प्रवेशित याद्यांमधील त्रुटी पडताळणीसाठी सर्व विधी महाविद्यालयांना डेक्कन कॉलेज, पुणे येथे दिनांक १६.०४.२०१८ ते दिनांक २०.०४.२०१८ या कालावधीमध्ये बोलविण्यात आलेले आहे, सदरहू तपासणीचे वेळी उक्त निर्णयाचा आधार घेवून आपल्या महाविद्यालयामध्ये प्रवेशित दर्शविण्यात आलेल्या सर्व विद्यार्थ्यांचा तपशिल स्वतंत्रपणे सादर करण्यात यावा.

(डॉ. धनराज माने)
शिक्षण संचालक, उच्च शिक्षण
महाराष्ट्र राज्य, पुणे - १.

प्रत कार्यवाहीस्तव -

कुलसचिव, सर्व अकृषि विद्यापीठे, महाराष्ट्र राज्य

प्रत माहितीस्तव सविनय सादर -

१. मा. अपर मुख्य सचिव, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई - ३२
२. मा. आयुक्त, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, बांद्रे (पुर्व), मुंबई - ४०० ०५१
३. मा. सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण, बांद्रे (पुर्व), मुंबई - ४०० ०५१.